**प्रेसनोट** दिनांक २८/०६/२०१८

**तालुका नायगांव हद्दीतील ग्राम पंचायत मरवाडी, खैरगांव येथील ग्रामसेवक माणिक नारायणराव श्रीरामे यांनी ५,०००/—रु. लाच स्विकारल्यानंतर नांदेड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडले.**

यातील तक्रारदार यांनी दिनांक १४/०६/२०१८ रोजी कार्यालय पोलीस उप अधिक्षक, लाचलूपत प्रतिबंधक विभाग नांदेड येथे तक्रार दिली की, '' **त्यांचे भावाचे शेतात एम.जी.एन.ई.जी.एस या योजने अंतर्गत मंजुर सिंचन विहीरीवरील कार्यरत मजूरांच्या हजेरी पटावर स्वाक्षरी करण्याकरीता व ई मस्टर देण्याकरीता ग्रामसेवक श्रीरामे हे ७,०००/—रू. ची लाच मागणी करीत असल्याची तक्रार दिली**''.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १४/०६/२०१८ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड कार्यालयाकडुन पंचायत समिती नायगाव परिसरात पंचासमक्ष केलेल्या लाच मागणी पडताळणी मध्ये लोकसेवक श्रीरामे यांनी तक्रारदाराचे भावाचे शेतात एम.जी.एन.ई.जी.एस या योजने अंतर्गत मंजुर सिंचन विहीरीवरील कार्यरत मजूरांच्या हजेरी पटावर स्वाक्षरी करण्याकरीता व ई मस्टर देण्याकरीता त्यांच्या पदाचा दुरूपयोग करून स्वत:चा आर्थिक फायदा करून घेण्याचा उदेशाने तक्रारदार यांचेकडे ७,०००/— रुपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती ५,०००/—रू.ची लाच स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.

आज दिनांक २८/०६/२०१८ रोजी नायगाव ता.नायगाव बस्थानक रोडवरील अझहरी उडपी हॉटेल मध्ये लावण्यात आलेल्या सापळयामध्ये आरोपी लोकसवक माणिक नारायणराव श्रीरामे, ग्रामसेवक यांनी तक्रारदार यांचे भावाचे नमुद कामासाठी पंचा समक्ष ५,०००/—रू. लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर त्यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडण्यात आले आहे.

प्रस्तुत प्रकरणी पोलीस स्टेशन नायगाव जि.नांदेड येथे आरोपी लोकसेवक माणिक नारायणराव श्रीरामे, वय ३४ वर्ष, व्यवसाय नोकरी, ग्रामसेवक नेमणुक ग्राम पंचायत मरवाडी व खैरगाव ता.नायगाव मुळ राहणार मीनकी ता.बिलोली सध्या राहणार विठ्ठलनगर नायगाव यांचे विरुध्द कलम ७, १३ (१)(ड) सह १३(२) भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ नुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणीचे मोबाईल फोनवर लोकसेवक यांचे एसएमएस किंवा व्हिडीओ, ऑडीओ क्लिप असल्यास, भ्रष्टाचार संबधाने कांही माहिती असल्यास किंवा माहिती अधिकारात शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी शासकीय निधीचा भ्रष्टाचार केला असेल तर खालील क्रमांकावर संपर्क करावा.

१) टोलफ्री हेल्पलाईन क्रमांक :— १०६४ (२) कार्यालयाचा फोन क्रमांक ०२४६२—२५३५१२

३) श्री संजय कुलकर्णी, पो.उप अधि.यांचा मोबाईल क्रमांक ८५५४८५२९९९

Website :- www.acbmaharashtra.gov.in, Mobile App :- www.acbmaharashtra.net
Facebook Page :- www.facebook.com/MaharashtraACB

कार्यालय, पोलीस उप अधिक्षक, ला.प्र.वि. नांदेड युनिट

( संजय कुलकर्णी )
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड.